**शपथेवरुन साक्ष**

**उलट तपास प्रतिवादीतर्फे त्यांचे वकील श्री जुमडे यांचे मार्फत** :–

१. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.५८७, ४७, ४१ हे माझ्या वडीलांनी स्वकष्टाजीत मिळकतीतून विकत घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, १९८५ साली माझ्या वडीलांनी गट क्र.५८७, ४७ व ४१ च्या आपसी वाटण्या करुन दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.५८७ माझ्या आईच्या वाटणीला आला होता. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.५८७ चा ७/१२ माझ्या आईच्या नावाने तयार झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.४७ चे माझी आई, मी व माझ्या बहिनीच्या नावाने वडीलांनी तीन हिस्से करुन दिले होते. साक्षीदार सांगते आईच्या नावे करुन दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सन २००९–१०, सन २०११ व सन २०१३ मध्ये जमीन सरकार भूसंपादनाकरिता माझे वडीलांना मोबदला मिळाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यापूर्वी माझे वडील मरण पावले होते. हे म्हणणे खरे आहे की, भूसंपादनामध्ये मोबदला म्हणून तांबेखनी येथे भूखंड क्र.९४ मिळाला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.२७.०९.२०१३ रोजी मला, माझी आई व माझ्या दोन बहिनींना भूखंड मिळाल्या संदर्भात ताबा पावती मिळाली होती. सदर पावती साक्षीदाराला उलट तपासात दाखविल्यामुळे त्यास **नि.क्र.५१** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, सन २००९ मध्ये मी व माझे पती गोसीखुर्द धरणामध्ये गेलेल्या जमिनीसंदर्भातील पैसाकरिता माझी आई नेताई हिला त्रास व धमकी देत होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या त्रासामुळे माझ्या आईने दि.१२.०१.२००९ रोजी मी व माझ्या पती विरोधात पोलीस स्टेशन भिवापूर येथे तक्रार केली होती. माझी आई अंगठा करीत होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या विरुद्ध अदखल पात्र गुन्हा नोंद झाला होता.

२. हे म्हणणे खरे नाही की, जून २००९ मध्ये मी पुन्हा माझ्या आईला त्रास दिल्यामुळे तिने अदखल पात्र गुन्हा नोंद केला होता. आता मला दि.११.०९.२०१३ ची भूसंपादनासंदर्भाची नोटीस दाखविण्यात आली ती तीच आहे. सदर दस्त साक्षीदाराला उलट तपासात दाखविल्यामुळे त्यास **नि.क्र.५२** देण्यात येते. आता मला दि.२२.०८.२०११ ची नागतरोली येथील जमिनीच्या भूसंपादनासंदर्भाची नोटीस दाखविण्यात आली ती तीच आहे. सदर दस्त साक्षीदाराला उलट तपासात

दाखविल्यामुळे त्यास **नि.क्र.५३** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, वकील शिशुपाल रंगारी यांनी ग्रा.पं. भिवापूर (पूर्नवसण) यांना नोटीस पाठविले होता. हे म्हणणे खरे आहे की, मी रंगारी वकीलांमार्फत ग्रा.पं.ला नोटीस पाठविला होता. आता मला दि.३०.११.२०१३ रोजीची भूसंपादनासंदर्भाची नोटीस दाखविण्यात आली ती तीच आहे. सदर दस्त साक्षीदाराला उलट तपासात दाखविल्यामुळे त्यास **नि.क्र.५४** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वडीलांच्या खात्यात असलेले पैसे त्यांच्या मृत्यूनंतर काढण्याकरिता गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी बॅंकेने मला वारसदाराचे शपथ पत्र आणा म्हणून सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि.२९.१०.२०१३ रोजी मी तहसील कार्यालय येथे गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी मी शपथ पत्र करायचे आहे असे खोटे सांगून माझी आई नेताई व प्रतिवादी यांचचे खोटे वाटणी पत्रावर सही करुन घेतली. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.३६ वरील वाटणी पत्र तेच आहे जे मी धोक्याने करुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.३६ वरील वाटणी पत्राकरिता माझी आई व प्रतिवादीला फोटो काढण्याकरिता नेले होते. गट क्र.५८७ वर वाटणी पत्र करण्यापूर्वी केवळ माझ्या आईचे नाव ७/१२ उताऱ्यावर होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.५८७ वर १९८५ पासून माझ्या आईचे नाव आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने गट क्र.२४/१ सन २०१२ मध्ये विकला होता. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२४/१ माझ्या आईला तिच्या आईकडून मिळाली होती. माझी आई ही अंगठ्याचे निशाण करत होती व तिला काही कळत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वाटणी पत्राला माझ्या आईने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी उपविभागीय अधिकारी यांच्या अपीला वरील आदेशा विरोधात जिल्हाधिकारी नागपूर यांच्याकडे अपील केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे ते अपील नामंजूर करण्यात आले होते. मी २० वर्षांपासून अंगणवाडी सेविका म्हणून काम करते. मी जिल्हाधिकारी नागपूर यांच्या आदेशाविरोधात आयुक्तालय येथील अप्पर आयुक्त यांच्याकडे अपील दाखल केले होते. ते अपील नामंजूर करण्यात आले होते. आता मला दि.१०.०४.२०२४ चे अप्पर आयुक्त यांचे अपीलावरील आदेशाचे प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली त्यास **नि.क्र.५५**

देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, मी तहसील कार्यालयात संगनमत करुन वाटणी पत्राच्या आधारे नि.क्र.३७ वरील फेरफार केवळ दहा दिवसांत मंजूर करुन घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने गट क्र.५८७, गट क्र.४७ मधील १/३ तिचा हिस्सा व भूसंपादनामध्ये मिळालेल्या मोबदल्या संदर्भातील तिचा हिस्सा प्रतिवादीला दि.२९.०३.२०१७ चे मृत्यू पत्रान्वये करुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे आईचे सामान कोणाला न सांगता तिच्या घरातून काढून नेले. हे म्हणणे खरे नाही की, त्याकरिता प्रतिवादीने तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.५८७ चा प्रतिवादीला विल्हेवाट लावण्याचा पूर्ण अधिकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यातील परिच्छेद क्र.३ हा मी खोटा सांगत होती. हे म्हणणे खरे आहे की, कुसुम मरण पावल्यानंतर तिच्या पतीने फेरफार करिता अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो अर्ज तहसीलदार यांनी खारीज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.१४.०२.२०१२ रोजी मी कुसुम मरण पावल्यानंतर तिची मालमत्ता माझ्या नावावर होण्याकरिता तहसीलदार यांच्याकडे अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी कुसुमचे पती व वारसांना नोटीस काढला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी कुसुमच्या पतीचे नाव खारीज करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२३.१०.२०१३ च्या आदेशान्वये मय्यत कुसुम हिचे वारस म्हणून माझे, माझी आई व प्रतिवादी यांचे नाव नोंदविण्याबाबत तहसीलदार यांनी आदेश केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२३.१०.२०१३ च्या आदेशाची अंमलबजावणी होऊ दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तहसील कार्यालयात संगनमत करुन वाटणी पत्राच्या आधारे नि.क्र.४६ वरील खोटा फेरफार मंजूर करुन घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञा पत्रातील परिच्छेद क्र.३ हा मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञा पत्रातील परिच्छेद क्र.६ मध्ये दावा मिळकतीपैकी ४७/१ मला व प्रतिवादीला वारसा हक्काने मिळाली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ४७/१ चे माझे व प्रतिवादीमध्ये आपसी वाटण्या करुन घेतले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथ पत्रातील परिच्छेद क्र.८ मधील नमुद जंगम मालमत्ता मी व माझ्या पतीने नेली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथ पत्रातील परिच्छेद क्र.९ पुर्ण खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने माझ्या कब्जे वहीवाटीस कधीही अडथळा निर्माण केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी व तिचा पती नागपूरला

राहतात. मला ७०८९ रु. पगार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीचा हिस्सा हडपण्याकरिता खोटे वाटणी पत्र करुन खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथ पत्र करुन खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-

दिनांक - ३१.०७.२०२५.

(एस. जे. लाड)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भिवापूर.